मा .अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :- १/ ६८
दिनांक :- २८/४/२०२१

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका,पुणे-५.
जा.क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ ८०६
दिनांक :- २८/०४/२०२१

-: आज्ञापत्र :-

विषय :- पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / कनिष्ठ अभियंता (वाहतूक) वर्ग -३ या पदावरून उप अभियंता (वाहतुक नियोजन) वर्ग २ या पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देणेबाबत.

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.१/२४, दि. २८/०४/२०२१.
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र.१/ ६७/ दि. २८/४/२०२१

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) /कनिष्ठ अभियंता (वाहतूक) वर्ग -३ या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यामधून अर्हता धारण करणार्यात सेवकांना उप अभियंता (वाहतुक नियोजन) वर्ग २ (वेतनश्रेणी रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ५४०० + मान्य भत्ते) या पदावर तदर्थ पदोन्नती नेमणुक करणेबाबत संदर्भ क्र. १ व २ चे मान्यतेस अनुसरून खालील सेवकाची या आज्ञापत्राच्या दिनांकापासून पदोन्नतीने तदर्थ (Ad-hoc) नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवकाचे नाव व गट | तदर्थ पदोन्नतीचा प्रवर्ग | सध्याचे खाते | बढतीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील संदीप रघुनाथ (इमाव) | खुला | प्रकल्प कार्यालय क्र. १ | वाहतुक नियोजन विभाग | शेड्यूलमान्य रिक्त जागी |

१) शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र. क्र.३६६/१६-ब, दि. दि.२०/०४/२०२१ अन्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९/१२/२०१७ व शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र. क्र.३६६/१६-ब, दि.१८/०२/२०२१ रद्द करण्यात येवून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील आरक्षित पदे रिक्त ठेवून खुल्या प्रवर्गातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात यावी, असे नमूद आहे.

२) त्यानुसार वरील सेवकाची उप अभियंता (वाहतूक नियोजन) पदावरील तदर्थ पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे :-

(अ) सदर अधिकाऱ्याविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही.

(ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिका-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

३) वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र. ३३१५१/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

४) वरील अधिकारी यांचे पदोन्नती संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक इत्यादी बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता पदावनत करण्यात येईल.

५) वरील अधिकारी यांनी आज्ञापत्र हाच कार्यमुक्ती आदेश समजून संबंधित खात्यात त्वरीत रुजू व्हावे व निवेदन आमचेकडे सादर करावे.

६) वरील अधिकारी यांनी आज्ञापत्राच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत पदोन्नतीचे खात्यात रुजू व्हावे. सदर मुदतीत रुजू न झालेस सदरची पदोन्नती आपोआप रद्द होईल.

७) उपरोक्त अधिकारी यांना महानगरपालिका सेवाविनियम व वेळोवेळी शासन पारित करतील ते शासन निर्णय लागू होतील.

८) संबंधित अधिकारी यांना मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

९) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त अधिकारी यांचे सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Rubal 09/4/21

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत : संबधित खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना...